महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ■ १५ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २३० ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये


लक्षवेधी

## उल्हासनगरात वालधुनी नदी प्रदूषणाचा प्रश्न गंभीर



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** शहरामधून वाहाणाऱ्या वालधुनी नदीच्या प्रदुषणात प्रचंड वाढ होत आहे. दररोज अंबरनाथच्या एमआयडीसी येथील रासायनिक कंपन्यांद्वारे निकृष्ट आणि दूषित केमिकलचे पाणी वालधुनी नदीत सोडल्याने नदीतील पाणी काळे पिवळे झाले आहे. एमआयडीसी या प्रदुषणाकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नदी संवर्धन समितीने केला आहे.अंबरनाथ येथील एमआयडीसीमधील रासायनिक कंपन्यांचे दुषित सांडपाणी कोणती रासायनिक प्रक्रिया न करता वालधुनी नदीत दररोज सोडन्यात येत असल्याने ही नदी ही प्रदूषित झाली असून. या केमिकलमुळे नदीच्या पाण्याचा रंग हा दरदिवशी बदलत चालला आहे. या दूषित केमिकलच्या उग्र वासामुळे नागरिकांचे डोळे चूरचुरणे श्वासनाचा त्रास वाढत आहे . एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अभियंता संजय ननवरे यांच्याकडे जल बिरादरी आणि नदी संवर्धन समितीचे अध्यक्ष शशिकांत दायमा यांनी निवेदन देऊन वालधुनी नदीमध्ये होत आलेले प्रदूषण तातडीने थांबवण्याची मागणी केली.

## डोंबिवलीत बर्फातील पाच शिवलिंगांची भव्य कलाकृती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - महाशिवरात्री हा हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा सण आहे. हा सण मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात सर्वत्र साजरा केला जातो. या निमित्ताने शहरातील शिवमंदिरांमध्ये दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत असते. रविवारी १५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्र असल्याने शहरातील विविध मंदिरांमध्ये दिवसभर पूजा-अर्चा, अभिषेक आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तर डोंबिवलीत एका संस्थेच्यावतीने विशेष आकर्षक शिवप्रतिमा साकारली आहे.

ठाणे शहरासह डोंबिवली शहराला सांस्कृतिक शहर म्हणून ओळखले जाते. या शहरात सर्व सण उत्साहात साजरे केले जातात. महाशिवरात्री निमित्त शहरातील मंदिरांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच मंदिरात फुलांची आरास केली जात आहे. महाशिवरात्रीच्या दिवशी शिवमंदिरात दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागतात आणि अनेक भक्त श्रद्धेने उपवास करतात. त्याचप्रमाणे शहरातील अनेक मंदिरांमध्ये दिवसभर पूजा-अर्चा, अभिषेक आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# मुंबई मेट्रो आता समुद्रामार्गे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :मुंबईकरांच्या प्रवासाचा चेहरामोहरा बदलणारी एक मोठी बातमी समोर आली आहे. मुंबई आणि आसपासच्या शहरांमधील रस्ते आणि लोकल ट्रेनवरील प्रचंड ताण कमी करण्यासाठी आता जलमार्गाचा प्रभावी वापर केला जाणार आहे. महामुंबई क्षेत्रातील वाहतूक कोंडीतून सुटका करण्यासाठी जल मेट्रो प्रकल्पाच्या दृष्टीने महाराष्ट्र सागरी मंडळाने अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले असून, लवकरच समुद्राच्या लाटांवरून जलद प्रवास करणे शक्य होणार आहे.**



### काय आहे प्रस्ताव?

मुंबई महानगर क्षेत्रात जल मेट्रो सेवा सुरू करण्यासाठी कोची मेट्रो रेल लिमिटेड यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. कोचीमध्ये यशस्वी ठरलेल्या जल मेट्रोच्या धर्तीवरच मुंबईतही हा प्रकल्प राबवला जाणार आहे.

या सल्लागार कंपनीने 10 नवीन जलमार्गांचा सविस्तर आराखडा तयार केला असून, तो आता अंतिम टप्प्यात आहे. महाराष्ट्र सागरी मंडळाने या प्रकल्पाला गती देण्यासाठी फिजिबिलिटी अहवालाच्या आधारे सविस्तर प्रकल्प अहवाल म्हणजेच डीपीआर तयार करण्याचे काम वेगाने सुरू केले आहे.

### कुठे सुरु होणार जल मेट्रो?

ऑगस्ट 2025 मध्ये सादर करण्यात आलेल्या प्राथमिक अहवालात एकूण 21 ठिकाणांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये मुंबईसह नवी मुंबई, ठाणे, कल्याण, वसई आणि मीरा-भाईंदर या शहरांना जलमार्गाने जोडण्याचा प्रस्ताव आहे. सध्या एमएमआर क्षेत्रात 21 जलमार्गांवर वाहतूक सुरू असून त्याचे अंतर 85 किमी इतके आहे. मात्र, नवीन 10 जलमार्ग सुरू झाल्यानंतर हे जाळे एकूण 200 किमीपर्यंत विस्तारणार आहे. यामुळे प्रवाशांना लोकल आणि मेट्रोसोबतच जल मेट्रोचा एक सक्षम आणि वेगवान पर्याय उपलब्ध होईल.

### भविष्यातील लोकसंख्या आणि पर्यावरणपूरक प्रवास

एका अंदाजानुसार, 2030 पर्यंत मुंबई महानगर क्षेत्राची लोकसंख्या 3 कोटींच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. अशा वेळी केवळ रस्ते आणि रेल्वेवर अवलंबून राहणे कठीण होणार आहे. जल मेट्रो हा केवळ वाहतूक कोंडी फोडणारा पर्याय नसून तो पूर्णपणे पर्यावरणपूरक असणार आहे. सागरमाला योजना 2.0 अंतर्गत या प्रकल्पासाठी 60 टक्के निधी केंद्र सरकार आणि 40 टक्के निधी राज्य सरकारकडून दिला जाणार आहे. या प्रकल्पाबाबत अधिक माहिती देताना सागरी मंडळाने खासदार रवींद्र वायकर यांना लेखी कळवले आहे की, नवीन जलमार्गांच्या आराखड्याचे काम आता शेवटच्या टप्प्यात आहे. मुंबईला विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला असून त्याचा वापर प्रवासासाठी केल्यास मुंबईकरांचा वेळ आणि श्रम दोन्ही वाचणार आहेत. या जल मेट्रोमुळे मुंबई, मीरा-भाईंदर, वसई-विरार, कल्याण आणि ठाणे या पट्ट्यातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार असून वाहतूक कोंडीची समस्या बऱ्याच अंशी कमी होईल, अशी आशा वायकर यांनी व्यक्त केली आहे.

# ठाणे-नाशिक प्रवास सुसाट; साकेतजवळचा नवा पूल 2 दिवसांत खुला?

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : मुंबई-नाशिक महामार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी अतिशय महत्त्वाची आणि दिलासादायक माहिती समोर आलीय. साकेत पुलाच्या रखडलेल्या कामामुळे होणारी वाहतूक कोंडी आता इतिहास जमा होण्याच्या मार्गावर आहे. ठाणेकरांच्या आणि मुंबई-नाशिक मार्गे ये-जा करणाऱ्या प्रवाशांच्या संयमाची परीक्षा घेणाऱ्या साकेत पुलाचे काम अखेर पूर्णत्वास आले आहे. शुक्रवारी (13 फेब्रुवारी) पुलावर 31 डंपर्सच्या सहाय्याने लोड तपासणीचे काम सुरू होते. लोड तपासणी पूर्ण झाल्यानंतर आणि रिपोर्ट आल्यानंतर 16 फेब्रुवारी किंवा 17 फेब्रुवारीपासून हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिलीय.

### वाहतूक कोंडीची समस्या सुटणार?

साकेत पुलाला समृद्धी महामार्ग जोडण्यात आल्याने भविष्यातील ट्रॅफिकची बाब लक्षात घेऊन महामार्गाचे रुंदीकरण करण्यात येत आहे. त्यामुळे जुना साकेत पुलाच्या शेजारी नवीन पुलाच्या उभारणीचे काम हाती घेण्यात आले. जुन्या पुलाच्या झालेल्या दुरवस्थेमुळे प्रवाशांना वाहतूक कोंडीच्या समस्येचा सामना करावा लागत असे. अखेर नव्या साकेत पुलाचे काम पूर्ण झालं असून लोड टेस्टिंगचे तपासणीचे काम उर्वरित असल्याचे कळतंय.

**नवा साकेत पूल वाहतुकीसाठी कधी खुला होणार?** यानुसार एमएसआरडीसी विभागाने 13 फेब्रुवारी रोजी 31 डम्परच्या मदतीने तपासणी सुरू केली. प्रत्येक डम्पर 35 टन वजनाचा आहे, 24 तास हे डम्पर या पुलावर वाहतूक करतील. याद्वारे लोडिंग टेस्ट केली जाईल. तपासणी अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात येईल. रिपोर्ट सादर केल्यानंतरच पूल पुढील दोन ते तीन दिवसांत वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार असल्याची माहिती समोर आलीय.

नवीन पूल 200 मीटर लांबीचा आहे. याचा वापर ठाणे ते नाशिक, मुंब्रा, नवी मुंबई आणि भिवंडीच्या दिशेने वाहतूक करण्यासाठी केला जाईल. तर जुन्या पुलाचा वापर नाशिक, मुंब्रा, नवी मुंबई आणि भिवंडी ते ठाण्याकडे जाण्यासाठी केला जात असे.

# पॉड टॅक्सी आराखडा तयार करा

## - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** प्रवाशांना घरापासून ते थेट कामाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी मुंबई ‘एमएमआर’ क्षेत्रातील महापालिकांनी पॉड टॅक्सी सुरू करण्यासाठी आराखडा तयार करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.



मेट्रो आणि लोकल प्रवासाला पूरक अशी ‘पॉड टॅक्सी’ सेवा ‘एमएमआर’मधील शहरांत सुरू करण्याबाबत सविस्तर आढावा उपमुख्यमंत्री शिंदे यांनी घेतला. नागरिकांना ‘लास्ट माईल कनेक्टिव्हिटी’ देण्यास महापालिकांनी प्राधान्य द्यावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

नंदनवन येथे झालेल्या आढावा बैठकीस उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नविन सोना, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव, ‘एमएमआरडीए’चे अतिरिक्त आयुक्त अश्विन मुदगल, ठाण्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, आदी अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, प्रवाशांना घरापासून रेल्वे किंवा मेट्रो स्टेशनपर्यंत आणि तिथून गंतव्य स्थान हा टप्पा पार करण्यासाठी रिक्षा किंवा बसवर अवलंबून राहावे लागते. यासाठी होणारी गर्दी, तसेच रस्त्यावरील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून पॉड टॅक्सी चालवण्याचे नियोजन करावे. यामुळे मेट्रोचा वापर वाढण्यास मदत होईल आणि रस्त्यांवरील खासगी वाहनांचा भार कमी होईल. हा प्रकल्प राबवण्यासाठी ‘एमएमआरडीए’ची मदत घेण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

महापालिकांनी आपल्या विकास आराखड्यात लास्ट माईल कनेक्टिव्हिटीला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. या सेवेमुळे प्रवाशांचा वेळ वाचणार असून इंधन बचतीमुळे पर्यावरणाचे रक्षण होईल, असेही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.






# महाशिवरात्रीची व्रतकथा

उत्तरादाखल शंकराने पार्वतीला 'शिवरात्री'च्या व्रताची कथा सांगितली. 'एका गावात एक शिकारी राहत होता. मुक्या जनावरांची हत्या करून तो आपल्या कुटुंबाचे पालन पोषण करीत असे. तो सावकाराचा कर्जदार होता. त्याने त्याचे कर्ज वेळेवर चुकविले नव्हते. त्यामुळे संतापून सावकाराने शिकारीला शिवमठात कैदी बनविले. योगायोगाने त्याच दिवशी शिवरात्र होती.

शिकारी ध्यानमग्न होऊन शिवा संबंधित धार्मिक गोष्टी ऐकत राहिला. चतुर्दशीला त्याने शिवरात्रीची कथाही ऐकली. सायंकाळी सावकाराने त्याला जवळ बोलावून कर्ज फेडण्याविषयी विचारले. शिकारी दुसऱ्या दिवशी सर्व कर्ज फेडेन असे वचन देऊन कैदेतून सुटला.

आपल्या दिनचर्येप्रमाणे तो जंगलात शिकारीसाठी निघाला. पण दिवसभर कैदेत राहिल्यामुळे तो तहान-भुकेने व्याकूळ झाला होता. शिकार करण्यासाठी तो तलावाकाठच्या बेलपत्राच्या झाडावर मचाण बांधू लागला. बेल-वृक्षाच्या खाली बेलपत्रांनी झाकले गेलेले शिवलिंग होते. शिकाऱ्याला मात्र हे माहीत नव्हते. मचाण बनविताना त्याने ज्या फांद्या तोडल्या त्या योगायोगाने शिवलिंगावर पडल्या. याप्रकारे दिवसभर उपाशी असलेल्या शिकाऱ्याचे व्रतही झाले आणि त्याच्याकरवी शिवलिंगावर बेलपत्रही वाहिले गेले.

एका प्रहरानंतर एक गर्भिणी हरणी तलावावर पाणी पिण्यासाठी पोहचली. शिकाऱ्याने आपल्या धनुष्याने तिच्यावर नेम साधलाच होता तितक्यात ती हरिणी बोलली, मी गर्भिणी आहे, तू एकाच वेळी दोन जीवांची हत्या करशील. हे योग्य नाही. मी आपल्या पिलाला जन्म देऊन लवकरच तुझ्यासमोर येईल. तेव्हा तू मला मार.' शिकाऱ्याने धनुष्य बाजूला ठेवले आणि हरिणी झाडांआड लुप्त झाली.

काही वेळाने दुसरी हरिणी तेथून निघाली. शिकाऱ्याच्या आनंदाला पारावर उरला नाही. त्याने तिच्यावर नेम साधला. हे बघून त्या हरिणीने त्याला सांगितले, की 'हे पारधी! मी एक कामातूर विरहिणी आहे. आपल्या प्रियेच्या शोधात भटकत आहे. मी माझ्या पतीला भेटून लवकरच तुझ्याजवळ येईल.'

शिकारीने तिलाही जाऊ दिले. दोनदा शिकार हातातून गेल्यामुळे तो चिंतित झाला. तेवढ्यात एक हरिणी आपल्या



पिलासोबत तेथून निघाली. शिकाऱ्याला जणू सुवर्णसंधीच मिळाली. त्याने धनुष्याला बाण लावला आणि बाण सोडणार तेवढ्यात ती हरिणी बोलली, हे पारधी! मी माझ्या पिलाला त्याच्या वडिलांकडे सोडून लगेच येते, यावेळी तू मला मारू नकोस.'

शिकारी हसला आणि म्हणाला समोर आलेली शिकार सोडून द्यायला मी काही मूर्ख नाही. याआधी मी दोनदा शिकार गमावली आहे. माझी मुले तहान-भुकेने व्याकूळ झाले असतील.उत्तरादाखल हरिणी म्हणाली, जशी तुला आपल्या मुलांची काळजी वाटते आहे तशीच मलाही वाटत आहे. त्यामुळे मी फक्त काही काळ तुझ्याकडून जीवनदान मागत आहे. माझ्यावर विश्वास ठेव. मी लगेच परत येईल.

हरिणीचा तो व्याकूळ स्वर ऐकून शिकाऱ्याला तिची दया आली. त्याने तिलाही जाऊ दिले. शिकार न मिळाल्यामुळे तो बेलाच्या झाडावर बसून बेलपत्र तोडत खाली फेकत होता. काही वेळाने एक धष्ट-पुष्ट मृग त्या रस्त्यावरून जात होता. आता या मृगाची नक्कीच शिकार करावी असा विचार केला.

पण त्याच्यावर नेम धरला असता मृग दीनवाण्या स्वरात म्हणाला, 'हे पारधी! जर तू माझ्या आधी तीन हरिणींना मारले असेल तर मला मारण्यातही वेळ करू नकोस, म्हणजे त्यांच्या वियोगात मला एकही क्षणाचे दु:ख सहन करावे लागणार नाही. मी त्यांचा पती आहे आणि जर तू त्यांना जीवनदान दिले असशील तर मला काही क्षणांसाठी जीवनदान देण्याची कृपा कर. मी त्यांना भेटून तुझ्यासमोर हजर होईल.

मृगाचे बोलणे ऐकून शिकाऱ्याच्या डोळ्यासमोरून संपूर्ण रात्रीचे घटना-चक्र आले. त्याने सर्व कथा मृगाला ऐकविली. तेव्हा मृगाने सांगितले, ' माझ्या तीनही पत्नी येथून वचनबध्द होऊन गेल्या आहेत, मात्र त्या माझ्या मृत्यूनंतर आपल्या धर्माचे पालन करू शकणार नाहीत. त्यामुळे तू मला आता जाऊ दे, मी त्यांच्यासमवेत तुझ्यासमोर हजर होतो.उपवास, रात्रीचे जागरण तसेच शिवलिंगावर बेलपत्र चढविल्यामुळे शिकारीच्या हिंसक ह्रदयाचे निर्मल ह्रदयात परिवर्तन झाले होते. धनुष्य त्याच्या हातातून निसटले. शिवाने त्याच्या ह्रदयात बदल घडवून आणला. त्याला आपल्या भूतकाळातील कर्मांचा पश्चात्ताप झाला.

थोड्याच वेळात मृग सपरिवार शिकाऱ्यासमोर आला. या प्राण्यांमधील प्रेम पाहून शिकाऱ्याच्या डोळ्यातून अश्रू वाहायला लागले. शिकाऱ्याने त्यांना न मारता आपणही मुक्या प्राण्यांची हिंसा न करण्याचे ठरविले. देवलोकातून समस्त देव ही घटना बघत होते. घटनेची परिणती झाल्याबरोबर देवी-देवतांनी फुलांचा वर्षाव केला. तेव्हा शिकारी तसेच मृग परिवाराला मोक्षप्राप्ती मिळाली.



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ताच्या सर्व वाचकांना

महाशिवरात्रीच्या शुभेच्छा !

# ठाणेकर जलतरणपटू रेयांश खामकरची लंडन वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद



## ठाणेकरांसाठी अभिमानाची बाब – महापौर शर्मिला पिंपळोलकर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे, दि. 13 :** ठाण्यातील अवघ्या ७ वर्षांच्या रियांश सानिका दीपक खामकरने अरबी समुद्रात ३० किमी एकट्याने पोहून विश्वविक्रम प्रस्थापित केला. 15 नोव्हेंबर 2025 रोजी 7 तास 30 मिनिटे 11 सेकंदांत हे अंतर पोहून पूर्ण केलेल्या त्यांच्या पराक्रमाची नोंद लंडन वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली आहे. रियांश खामकरने 'स्टारफिश स्पोटर्स फाऊंडेशनचे प्रशिक्षक कैलाश आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणाचे धडे घेत असून ठाणे महापालिकेच्या कै. मारोतराव शिंदे तरणतलाव येथे नियमित सराव करीत आहे. रेयांशच्या या यशामुळे ठाणे महापालिकेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असल्याचे सत्काराप्रसंगी महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी नमूद केले.

यावेळी महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते गोवा येथे हवाई बीच ते हवाई वेल्हा बीच येथे 26 जानेवारी 2026 रोजी 10 कि.मी सागरी अंतर पार केलेले जलतरणपटू आयुषी आखाडे, सुयश हिंदळेकर, ध्रिती कोळी, समिप्ता व्हावळ, रेयांश खामकर, ओजस मोरे, गार्गी भरणुके, सिद्ध मुपेनेट्टी, विवान गुरसुळे, समर्थ भिलारे यांचाही सन्मान करण्यात आला. तसेच जलतरणपटूंचे प्रशिक्षक कैलास आखाडे यांचाही सन्मान करण्यात आला

यापूर्वी रियांशने विजयदुर्ग येथील अरबी समुद्रात मालपे जेट्टी ते वाघोटन जेट्टी हे 15 किलोमीटरचे आव्हानात्मक सागरी अंतर तीन तासात पोहून पार केले आहे. 15 कि.मीचे अंतर पार करणारा रेयांश खामकर हा सर्वात लहान जलतरणपटू ठरला आहे. त्याची दखल इंडिया बुक रेकॉर्डने घेतली आहे.

रेयांश खामकर हा स्टारफिश स्पोर्टस फाऊंडेशनच्या माध्यमातून जलतरणाचे धडे प्रशिक्षक कैलास आखाडे यांच्याकडून घेतो. रेयांश ठाणे महापालिकेच्या मारोतराव शिंदे तरणतलाव येथे दररोज सराव करतो. रेयांश हा ठाण्यातील नौपाडा येथील सरस्वती इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा विद्यार्थी आहे. गेल्या वर्षभरात विविध स्पर्धामध्ये रेयांशने 13 पदके प्राप्त केली आहेत, त्यात 5 सुवर्ण, 5 रौप्य व 3 कांस्य पदकांचा समावेश आहे.

2 जून 2024 मध्ये ठाणे येथे झालेल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत 25 मीटर बटरफ्लाय विथ फिन्स स्पर्धेत त्याने सुवर्णपदक तर 50 मीटर फ्रीस्टाईल विथ फिन्समध्ये कांस्य पदक प्राप्त केले आहे. 6 जुलै 2024 रोजी कोल्हापूर येथे झालेल्या महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा या त्रिराज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत त्याने 50 मीटर बॅकस्ट्रोक मध्ये सुवर्णपदक प्राप्त केले आहे. 17 ते 18 ऑगस्ट 2024 रोजी बँकॉक, थायलंड येथे झालेल्या आशियाई ओपन स्कूल्स स्विमिंग चॅम्पियनशिपमध्ये रेयांशने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. तो महाराष्ट्र एक्वाटिक असोसिएशनने निवडलेल्या 15 जलतरणपटूंपैकी एक असून, त्याने आंतरराष्ट्रीय जलतरण स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. 6 वर्षांखालील मुलांच्या गटात 25 मीटर फ्रीस्टाइल किकबोर्डमध्ये रौप्य पदक, 25 मीटर फ्री स्टाईलमध्ये कांस्य पदक, 50 मीटर ब्रेस्टस्ट्रोकमध्ये कांस्य पदक, 200मीटर फ्री स्टाईल रिलेमध्ये रौप्य पदक प्राप्त केले आहे.

15 सप्टेंबर 2024 मध्ये अंडरवॉटर स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र द्वारा आयोजित केलेल्या चौथ्या महाराष्ट्र राज्य फिन स्विमिंग स्पर्धेत रेयांशने 50 मीटर मोनोफिन सरफेस स्विमिंगमध्ये सुवर्णपदक, 100 मीटर बायफिन मिश्र रिलेमध्ये सुवर्णपदक, 50 मीटर बायफिन स्विमिंगमध्ये रौप्यपदक पटकाविले. सदरची स्पर्धा ही 8 वर्षे व त्यावरील वयोगटासाठी होती, परंतु रेयांशने आंतरराष्ट्रीय जलतरण स्पर्धेत केलेली कामगिरी लक्षात घेऊन 9 वर्षे या वरिष्ठ वयोगटात सहभागी होण्यासाठी त्याला विशेष प्रवेश देण्यात आला होता, ज्यामध्ये त्याने 9 वर्षांखालील जलतरणपटूंशी स्पर्धा केली.

9 ऑक्टोबर 2024 रोजी विबग्योर हायस्कूल खारघर येथे झालेल्या 16 व्या व्हिवा इंटरस्कूल जलतरण स्पर्धेत रेयांशने 20 मीटर बटरफ्लायमध्ये सुवर्णपदक आणि 20 मीटर बॅकस्ट्रोकमध्ये रौप्य पदक प्राप्त केले.

# अजितदादा गेल्याने कबड्डी क्षेत्राचे फार नुकसान : माजी खासदार रामशेठ ठाकूर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** "स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या निधनामुळे क्रीडा क्षेत्राचे, विशेषतः कबड्डी खेळाचे मोठे नुकसान झाले आहे," असे प्रतिपादन माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी केले. श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल येथे त्यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित रायगड जिल्हा कबड्डी पंच शिबिरात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सहकार्यवाह अॅड. आस्वाद पाटील, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या प्रमुख कार्यवाह डॉ. चित्राताई पाटील, सामाजिक कार्यकर्ते प्रसाद भोईर, प्रमुख मार्गदर्शक जे. जे. पाटील, जगदीश पाटील, शिवछत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक शरद कदम, सुमित




माने, नरेश म्हात्रे, जनार्दन पाटील, पनवेलचे क्रीडा प्रमुख व्ही. बी. नाईक, पंच मंडळाचे सचिव अॅड. अजिंक्य पाटील, कार्यालयीन प्रमुख अनिल कोळी यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना रामशेठ ठाकूर म्हणाले की, स्व. अजितदादा हे क्रीडा क्षेत्रातील आधारस्तंभ होते. कबड्डी खेळाडूंना ५ टक्के नोकरी आरक्षण देण्याचा निर्णय त्यांच्या प्रयत्नांतून झाला. पनवेलमध्ये आयोजित विविध स्पर्धांना त्यांची नेहमीच प्रमुख उपस्थिती असायची. त्यांनी महाराष्ट्र ऑलिंपिक कबड्डी संघटनेचे अध्यक्षपद भूषविले होते. त्यांच्या जाण्याने क्रीडा क्षेत्राची मोठी पोकळी निर्माण झाली असून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. दि. २० ते २२ दरम्यान होणाऱ्या रायगड जिल्हा चाचणी कबड्डी स्पर्धेसाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

राज्य कबड्डी असोसिएशनचे सहकार्यवाह अॅड. आस्वाद पाटील यांनी पंचांच्या अडचणी व तक्रारी जाणून घेत त्यांचे समाधान केले. "आम्ही पंचांच्या सोबत आहोत," असे सांगत त्यांनी पंचांना उद्बोधित केले.सदर पंच शिबिर सकाळी व दुपारच्या सत्रात पार पडले. राष्ट्रीय पंच सुहास पाटील आणि प्रसन्ना यांनी पंचांना सविस्तर मार्गदर्शन केले.

# तिर्थक्षेत्र श्रीसंगमेश्वर येथील पारंपरिक महाशिवरात्री यात्रा शिवमंदिराचे बांधकाम सुरु असल्याने रद्द!

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील प्रसिद्ध असलेली तिर्थक्षेत्र श्रीसंगमेश्वर येथील महाशिवरात्रीची यात्रा या वर्षी रद्द करण्यात आली आहे. काही महिन्यांपूर्वी शिव मंदिराचे व इतर परिसराचे पुनर्विकासाचे बांधकाम सुरू आहे. त्यामुळे मंदिर परिसरात बांधकाम करण्यासाठी लागणारे स्टिल, सिमेंट, खडी, दगड इत्यादी साहित्य ठेवण्यात आले आहे. त्यामुळे येणाऱ्या शिव भक्तांना व भाविकांना कुठल्याही प्रकारची इजा व अनर्थ होऊ नये म्हणून मुरबाड तहसीलदार यांच्या लेखी सुचनेनुसार दि. १४/२/२०२६ च्या मध्यरात्री पासून ते १७/२/२०२६ च्या मध्यरात्री पर्यंत ग्रामपंचायत प्रशासनाने या वर्षी महाशिवरात्री यात्रा न भरविण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने मंदिर परिसरात यावर्षी महाशिवरात्र रद्द असल्याचे सुचना फलक लावले असून शिव भक्तांना व भाविकांना विनंती केली आहे.

# महिलांच्या सुरक्षेसाठी दामिनी पथकाची 1013 जणांवर कारवाई

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण :** महिला आणि विद्यार्थिनींच्या सुरक्षेला प्राधान्य देत ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या कल्याण परिमंडळ ३ अंतर्गत दामिनी पथकाने विशेष मोहीम राबवून मोठी कारवाई केली आहे. कल्याण परिमंडळ 3 चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण- डोंबिवली शहरात विशेषतः शाळा-कॉलेज परिसरात मुलींची छेडछाड, सार्वजनिक ठिकाणी गैरवर्तन, व्यसनाधीन हालचाली आणि शांतता भंग करणाऱ्या १०१३ व्यक्तींवर दामिनी पथकाकडून ही कारवाई करण्यात आल्याची माहिती डीसीपी अतुल झेंडे यांनी दिली. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ कल्याण अंतर्गत कल्याण व डोंबिवली शहरातंर्गत सार्वजनिक गर्दीची व रहदारीची ठिकाणे, मॉल, उदयान, बागबगीचा, निर्जन ठिकाणे, शाळा, कॉलेज या ठिकाणी शाळकरी विदयार्थिनी, नोकरीस असलेल्या महिला यांची सुरक्षा व व्हॅलेटाईन दिनानिमित्त मुलीना त्रास देणे, छेडछाड करणे यासारख्या गुन्हयांना प्रतिबंध करणेसाठी दामिनी पथक परिमंडळ ३ कल्याण यांचेकडून विशेष सुरक्षा कारवाई मोहीम आखण्यात आली होती.

त्याअनुषंगाने दामिनी पथक परिमंडळ ३ कल्याण अंतर्गत शाळा व कॉलेज परिसरात मुलीची छेडछाड करणे, शाळा परिसरात व्यसन करणे, सार्वजनिक ठिकाणी अश्लील चाळे करणे, आराडाओरड करून शांतता भंग करून इतरांना त्रास देणे, यासारख्या गुन्हयांना वेळीच प्रतिबंध करून महिला सुरक्षा कारवाई करण्यात आलेली आहे.

विदयार्थी तसेच महिला यांचे सुरक्षेसाठी अशा गुन्हयाची माहिती मिळाल्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ कल्याण पोलीसांशी डायल ११२ नंबरवर संपर्क करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. तसेच यापुढेही कल्याण व डोबिवली शहरात दामिनी पथकाकडून अशा प्रकारची कारवाई सुरू राहणार आहे.



# शेगावच्या योगीराजाचा अखंड जल्लोष

**जिथे ज्ञान विज्ञान संजीव होते |**
**जिथे योग विद्येस सामर्थ्य येते ॥**
**जिथे मानवाला मिळे मोक्ष गाथा |**
**तुझ्या पायरीशी सदा नम्र माझा माथा ॥**

असे हे ब्रह्मांडनायक योगीपुरुष शेगांवचे गजानन महाराज यांचा प्रकटदिन (१४८ वा) सोहळा नुकताच ठाण्यातील ब्राह्मण सेवा संघात आणि प्रति शेगांव असलेल्या शिवाई मंदिरात मोठ्या उत्साहात साजरा झाला. दिवसभर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. शेगावात तर भक्तांचा उत्साह ओसंडून वाहत असतो. लाखो भाविक पायी येऊन महाराजांचे रांगेतून दर्शन घेताना दिसतात. महाराष्ट्रातच नव्हे तर देश-विदेशातील असंख्य भक्तगणांचे गजानन महाराज श्रद्धास्थान आहे.

माघ वद्य सप्तमीला शेगाव येथे गजानन महाराज प्रकट झाले. लाखो भाविक शेगावला जाऊन दर्शन घेतात तसेच आपापल्या परीने सेवा करतात. शेगावला जाणे शक्य नाही ते लोक दरवर्षी ठाण्यात ब्राह्मण सेवा संघात येऊन दर्शन घेतात. गजानन मंडळ ट्रस्टचे प्रमुख मोहन हळबे आणि मंडळाचे सभासद गेली कित्येक वर्षे या उत्सवाचे आयोजन करतात. शिवाई नगर मंदिरात देखील सेवा संघाप्रमाणेच कार्यक्रम होतात. प्रकट दिनाच्या आदल्या दिवशी पालखी निघते, त्याचे दर्शन सर्वांना मिळते. प्रकटदिनी सकाळी काकड आरती, रुद्राभिषेक जप, सामुदायिक पारायण, भजन, गायन, किर्तन असे भक्तीरुप कार्यक्रमाचे आयोजन सकाळपासून रात्रीपर्यंत केले जाते.

गजानन महाराज हे दत्त संप्रदायातील भारतीय गुरू होते. त्यांचा जन्म कधी झाला याचा ठावठिकाणा प्राप्त झालेला नाही. परंतु ते पहिल्यांदा त्यांच्या तरुण वयात म्हणजे ३०व्या वर्षी १८७८ च्या फेब्रुवारी महिन्यात २३ तारखेला दिसले. तेव्हापासून त्यांचे भक्त ही तिथी गजानन महाराज प्रकट दिन म्हणून साजरा करण्याची प्रथा चालू झाली.



आधूनिक काळातील गजानन महाराज हे थोर, संत आहेतच. गजानन महाराजांचे चरित्र दासगणू महाराजांनी श्री गजानन विजय ग्रंथामध्ये लिहून अजरामर केले आहे. या ग्रंथाचा संस्कृत अनुवाद हा नाशिक मधील प्रसिध्द विद्वान डॉ. श्री. प्रसादशास्त्री कुलकर्णी यांनी केला आहे. हल्ली ठिकठिकाणी गजानन महाराजांचे मठ असून तिथे रोषणाई केली जाते. प्रसादाचे वाटप होते.

गजानन महाराज अतिशय दयाळू होते. त्यांनी लोकांना भक्तीमार्गात आणून समाजकार्य केले. तसेच आपल्या लीलांनी अनेक चमत्कार केले. भगवान गणेशाचा अवतार पण महाराजांना लोक मानत कोणतेही अवडंबर न करता केवळ भक्तीमार्गाने देवापर्यंत पोहोचता येते हेच त्यांनी सांगितले. 'गण गण गणात बोते' हा मंत्र जगाला देऊन मनापासून भक्ती करा, दिखावा नको, हेच सतत लोकांना सांगत होते. खरीखुरी भक्ती करणाऱ्याला त्याची प्रचिती येत असे. त्यामुळे भक्तीस अंतर देऊ नका, असे शांतपणे सांगणारे सद्गुरु मिळाल्यामुळे भक्तगणात वाढ होत गेली. जसे गुळाला मुंगळे चिकटून राहतात तसेच भक्त त्यांच्या चरणाशी लीन झालेले दिसतात. एकदा शेगावची वाट धरलेला भक्त कधीच ती वाट सोडणार नाही, एवढी ताकद गजानन महाराजांच्या भक्तीत येते. कारण त्यांच्या भक्तीच्या सावलीतच जीवन जगण्याचा आनंद प्राप्त होतो. संपूर्ण शेगाव शहर हे या दिवशी 'गण गण गणात बोते' या गजरात तल्लीन असल्याचे पाहायला मिळते.

प्रकटदिनी ब्राह्मण सेवा संघात किर्तनात अलंकाराची पदवी प्राप्त केलेल्या सौ. शिवानी सचिन नेमावरकर यांचे कीर्तन संपन्न झाले. त्यांनी मुंबई, पुणे, कोकण या भागातून प्रवचने दिली आहेत. तसेच त्यांनी रामरक्षा स्त्रोत्र, देवी अष्टक, संपूर्ण वंदे मातरम इत्यादी विषयावर व्याख्याने, प्रवचने सेवा दिली आहे. गजानन महाराजांच्या प्रकटदिनी त्यांनी आपल्या सुश्राव्य आवाजात महाराजांच्या चरित्राबद्दल कथन केले. तसेच नामजपाचे महत्व विशद केले. उपस्थित असलेल्या श्रोत्यांना ते खूप आवडले. सालाबादप्रमाणे आमच्या मंडळातील गायन करणाऱ्या सौ. मोहिनी तेलवणे यांनी पण आपल्या मधूर आवाजाची मोहिनी घालून 'अमृताहूनी गोड नाम तुझे देवा' असे गाऊन मंत्रमुग्ध केले. गाण्यतला गोडवा अमृतमय केला.

ब्राह्मण संघ आणि शिवाई नगर येथे मिळणाऱ्या प्रसादाची विशेष खासियत आहे. झुणका भाकरी, आंबाड्याची भाजी, दाण्याची चटणी, लोणी, शिरा, कांदा असा पूर्णान्नाचा प्रसाद मिळाल्याने प्रसादाच्या आस्वादाने पोटाइतके मन पण समाधानाने भरून जाते आणि भक्तीची ओढ लागते. प्रकटदिनी गजानन महाराजांच्या दर्शनाला आमदार संजय केळकर, नगरसेवक सौ. मढवी, मृणाल पेंडसे, भाजपा अध्यक्ष संदिप लेले, नगरसेवक संजय वाघुले, सुभाष काळे व इतर मान्यवरांनी दर्शन घेतले. महाराजांवर असलेली श्रद्धा, त्यांची भक्ती दिसून आली.

**गजानन महाराजांची काय सांगावी थोरवी**
**भक्त सारे आजही नाम त्यांचेच गिरवी.**

**- लीना बल्लाळ ठाणे**
**९९२०५२४४२४**

# आमदार किसन कथोरेंच्या हस्ते रोहित शूज एन.एक्सचे उद्घाटन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड :** मुरबाड शहरात काँग्रेस भवन संकुलात पारसिक बँकेच्या खाली जाधव परिवाराने रोहित शूज एन. एक्स या नावाने नविन ठिकाणी सुरू केलेल्या चप्पल व शूज दुकानाचे उद्घाटन आमदार किसन कथोरेंच्या हस्ते आज करण्यात आले.श्याम जाधव हे मुरबाड शहरात गेले अनेक वर्ष चप्पल व शूजचा व्यवसाय करत आहेत.आता त्यांनी काँग्रेस भवन मध्ये मुरबाड करांसाठी नविन उत्तम व दर्जेदार चप्पल दुकान सुरू केले आहे. याठिकाणी ग्राहकांना खास वातानुकुलीत हवेमध्ये आग्र्याहून आणलेल्या व्हरायटी बघायला व खरेदी करता येणार आहेत.



यावेळी आमदार किसन कथोरे यांनी श्याम जाधव व त्यांची दोन्ही मुलं प्रथमेश व रोहित यांना नविन ठिकाणी सुरु केलेल्या व्यवसायाला भरभरून शुभेच्छा दिल्या. त्यांच्यासोबत आलेले टिडीसी बँकेचे संचालक राजेशदादा पाटील, खरेदी विक्री संघांचे चेअरमन संतोष पवार, भाजपा पुर्व मंडळाचे अध्यक्ष दिपक पवार, मनोज देसले, अतुल देशमुख उपस्थित राहून त्यांनीही जाधव परिवाराने नविन ठिकाणी सुरू केलेल्या व्यवसायाला शुभेच्छा दिल्या.

# हिंद-दी-चादर' उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## प्रभात फेरी व निबंध स्पर्धांतून शौर्य-बलिदानाचा संदेश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** 'हिंद-दी-चादर' म्हणून ओळखले जाणारे श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त ठाणे महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यांच्या त्याग, बलिदान आणि धर्मनिष्ठेचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमांना विद्यार्थ्यांसह शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

विद्यार्थ्यांना गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनकार्याची सविस्तर माहिती देण्यात येत आहे.




नौपाडा येथील सौ. आनंदीबाई केशव जोशी शाळेच्या विद्यार्थ्यांना प्रभात फेरी काढून गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या कार्याचा जागर केला. ठाणे महानगरपालिका शाळा क्र. 130 मधील विद्यार्थ्यांनी येथे प्रभात फेरी काढून घोषणांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. यावेळी त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. शाळांमध्ये विद्यार्थ्यांना गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनावर आधारित लघुपट दाखविण्यात आले

या उपक्रमांचा मुख्य उद्देश तरुण पिढीने गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा त्याग, बलिदान आणि मानवतेच्या रक्षणासाठी दिलेले योगदान स्मरणात ठेवावे, तसेच राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक मूल्यांची जपणूक करावी, हा आहे.

# भविष्यवेध



**रविवार**
**१५ फेब्रुवारी २०२६**

### मेष
शेजारी तुमची प्रशंसा करू शकतात आणि त्यांना पूर्ण पाठिंबा देऊ शकतात. देवी लक्ष्मीच्या रूपात नवीन पाहुण्यांचे आगमन तुमच्या घरात आनंदाचे वातावरण आणेल. दिवस उत्साहवर्धक असेल. एखादी मोठी

### वृषभ
संस्था तुमची कला लोकांसमोर सादर करू शकता. यामुळे तुम्हाला खूप प्रशंसा मिळू शकते. आज तुमच्या व्यवसायात चांगल्या ऑफर मिळू शकतात. तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत राहील.

### मिथुन
बालपणीच्या मित्रासोबत लांबच्या प्रवासाला जाऊ शकता. सरकारी कार्यालयात काम करणाऱ्यांना आज पदोन्नती मिळू शकते. बेरोजगार लोकांना आज नोकरी मिळण्याची शक्यता आहे.

### कर्क
व्यवसाय दुप्पट होण्याची शक्यता आहे. आज तुम्ही कुटुंबासह बाहेर जाण्याची योजना आखू शकता. प्रेमात असलेल्यांसाठी आजचा दिवस चांगला असेल. मुलांसोबत वेळ घालवाल.

### सिंह
संगीताची आवड असलेल्यांना आज एखाद्या मोठ्या कार्यक्रमात गाण्याची ऑफर मिळू शकते. तुम्ही तुमच्या शाळेतील मित्र आणि मित्रांसोबत बाहेर जाण्याचा बेत आखू शकता.

### कन्या
दिवस आनंददायी जाईल. तुम्ही मित्राच्या वाढदिवसाच्या पार्टीला देखील उपस्थित राहू शकता. कामावर एखादे काम पूर्ण करण्यासाठी घाई केल्याने समस्या उद्भवू शकतात; संयमाने काम करणे चांगले.

### तुळ
कॉलेज प्रोजेक्ट पूर्ण केल्याने तुम्हाला चांगले गुण मिळू शकतात. पालकांनी आज त्यांच्या मुलांच्या आहाराकडे लक्ष देणे आवश्यक आहे. गोड खाल्ल्याने तुमच्या आयुष्यात गोडवा येईल.

### वृश्चिक
विवाहित जोडप्यांनी अशी आश्वासने देणे टाळावे जे ते पूर्ण करू शकत नाहीत. यामुळे तुमचे नाते बिघडू शकते. दिलेलं आश्वासन न पाळल्याने आज पत्नी नाराज होऊ शकते. वैवाहिक जीवनात गोडवा येईल.

### धनु
काहीतरी नवीन शिकता येईल. जर तुम्ही आज अनावश्यक खर्च कमी करण्याचा प्रयत्न केला तर तुमच्या भविष्यासाठी पैसे वाचवणे सोपे होईल. तुमची आर्थिक परिस्थिती पूर्वीपेक्षा मजबूत होईल.

### मकर
कुटुंबासह बाहेर जेवायला जाऊ शकता. तुम्हाला नवीन कल्पना सुचतील, ज्यामुळे तुमच्या व्यवसायात लक्षणीय फायदा होईल. आज तुम्हाला तुमच्या कामात रस असेल. मित्रांसोबत फिरायला जाऊ शकता.

### कुंभ
नवीन जमीन खरेदी करण्याचा विचार करत असाल तर तुम्ही आजच ते करू शकता. याचा भविष्यात तुम्हाला नक्कीच फायदा होईल. तुम्हाला नक्कीच सकारात्मक परिणाम दिसतील. सरकारी परीक्षांची

### मीन
तयारी करणाऱ्यांना आज त्यांच्या मेहनतीचे फळ मिळू शकते. वैवाहिक जीवन आनंदी राहील. वास्तुकला क्षेत्रातील व्यक्तींसाठी आजचा दिवस चांगला असेल. अभ्यासात वाढ करण्याची गरज आहे

# अज्ञात चोरट्यांकडून सव्वा दोन लाखांचा माल लंपास

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली :** कल्याण-शीळ मार्गावरील नेकणीपाडा येथील गायकर निवासमधील तुम्बा वाईन शॉपच्या छताचा पत्रा उचकटून चोरट्यांनी आतमध्ये प्रवेश केला. चोरट्यांनी आतमधील बीअरच्या बाटल्या आणि रोकड, असा २ लाख २१ हजार १९० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना बुधवारी मध्यरात्री घडली. गुरुवारी सकाळी साडेदहा वाजता चोरीचा प्रकार उघडकीस येताच वाईन शॉपचे आकाशकुमार बजाज यांनी मानपाडा पोलिस ठाणे गाठत याप्रकरणी तक्रार दिली.



# के एन टावरे विद्यालयात निरोप समारंभ



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी तालुक्यातील जुनांदुर्खी येथील श्रमिक मंडळ,भिवंडी संचलित के एन टावरे विद्यालयात इयत्ता १० वीचा निरोप समारंभ व वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा नुकताच मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन के.एन.टावरे विद्यालय जू नांदुरखी (लाखीवली) शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका सुनीता जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा

या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी तानाजी रघुनाथ पाटील होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका सुनीता जाधव यांनी केले.सदर कार्यक्रमात इयत्ता दहावीच्या विद्यार्थांनी आपले मनोगत व्यक्त केले.तसेच तानाजी पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात विशेष प्राविण्य मिळविलेल्या त्यामध्ये आंतर शालेय क्रीडास्पर्धा, २६ जानेवारी, १५ ऑगस्ट, रक्षाबंधन, गुरु पौर्णिमा, नवरात्र उत्सव, शाळेमध्ये घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा यामध्ये विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते गौरव करण्यात आले,सदर कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक व मान्यवर उपस्थित होते. या वेळी शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग तसेच प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन गणेश केणे यांनी तर आभार प्रदर्शन प्रभाकर पाटील यांनी केले.

# मुलींच्या संरक्षणासाठी 'झिरो टॉलरन्स'

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण(प्रशांत घोडविंदे)** : व्हॅलेंटाईन डे'ला मुलींना त्रास देणे तसेच त्यांची छेड काढण्याचे प्रकार घडतात. या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी कल्याण पोलिस उपायुक्त परिमंडळ-३ च्या वतीने सार्वजनिक गर्दीची व रहदारीच्या ठिकाणी दामिनी पथकांच्या माध्यमातून विशेष सुरक्षा कारवाई मोहीम राबविली जाणार आहे. जर कुठे असे प्रकार घडत

## त्रास दिल्यास कडक शिक्षा निश्चित

असल्याचे निदर्शनास पडल्यास डायल ११२ नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस उपायुक्त अतुल झेंडे यांनी केले आहे.दामिनी पथकाकडून कारवाई सुरूशाळा व कॉलेज परिसरात मुलींची छेड काढणे, शाळा परिसरात व्यसन करणे, सार्वजनिक ठिकाणी अश्लील चाळे करणे, आरडाओरड करून शांतता भंग करून इतरांना त्रास देणे यासारख्या गुन्ह्यांप्रकरणी दामिनी पथकाने कारवाई केली आहे.जानेवारी आणि फेब्रुवारीत तब्बल १ हजार १३ जणांवर कारवाई केल्याची माहिती झेंडे यांनी दिली. व्हॅलेंटाईन डेनिमित्त कल्याण, डोंबिवली शहरांमध्ये दामिनी पथक तैनात असणार आहेत, असे झेंडे म्हणाले.

# शहापूर उंब्रावणे राखीव वनक्षेत्रात शेकडो दारुभट्ट्या

## कारवाईचा फक्त देखावा?

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड/शहापूर(प्रतिनिधी)** वनविभाग शहापूर अंतर्गत वनपरिक्षेत्र विहिगाव कडील राखीव वनक्षेत्रात चालवण्यात येत असलेल्या शेकडो दारुभट्टयांवर कारवाई होणेबाबत व संयुक्त वन व्यवस्थापन समिती विहीगाव च्या भ्रष्ट कारभाराबाबत चौकशी होणेकरीता दिनांक 02.02.2026 रोजी मा.मुख्य वनसंरक्षक ठाणे यांचे कार्यालयास तक्रार अर्ज दाखल केलेले आहेत. त्याबाबत अद्यापपर्यंत पर्यावरण व वनसंपदाचे होत असलेल्या अतोनात नुकसानी बाबत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसून ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील कसारा परिमंडळातील उंब्रावणे आणि दांड नियतक्षेत्रात राजरोसपणे शेकडो दारूभट्ट्या सुरू असल्याने आठवडा उलटूनही ठोस कारवाई झाली नसल्याने वनविभागाकडून थातुरमातुर कारवाई केल्याचा आरोप तक्रारदार हरेश हरड यांनी केला आहे. सध्याच्या घडीला शेकडो दारूभट्ट्या सदर परिसरात जैसे थे असल्याने वनविभागाच्या भोंगळ कारभारावर संशय व्यक्त केला जात आहे.



### शहापूर वनपरिक्षेत्रातील संयुक्त वन व्यवस्थापन समिती अंतर्गत झालेल्या भ्रष्टाचाराच्या चौकशीची हरेश हरड यांची मागणी

ठाणे वनवृत्त अंतर्गत शहापुर वनविभाग मध्ये उंब्रावने कं.नं.637,638 व 647 दांड कं.नं.646 मध्ये शेकडो दारू भट्या चालू असताना देखील मुख्य वनसंरक्षक ठाणे (CCF ठाणे ) व गस्त पथक प्रमुख ठाणे वनवृत्त यांचे कोणत्याही प्रकारचे लक्ष नसून सदर गंभीर विषयाची चौकशी करण्याचे सोडून अधिकारी व कर्मचारी यांना वाचवण्यासाठी धावपळ चालू असल्याचे आतापर्यंत झालेल्या कारवाईत समजत असून तुटपुंजी कार्यवाही करून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न चालू असल्याचा आरोप तक्रारदार हरेश हरड यांनी केला आहे.

तसेच वनविभाग शहापूर अंतर्गत येणाऱ्या वनपरिक्षेत्रातील संयुक्त वन व्यवस्थापन समिती अंतर्गत झालेल्या भ्रष्टाचार व शासकीय कामातील अनियमितता बाबत सखोल चौकशी होऊन, चौकशी मध्ये दोषी आढळलेल्या संबंधित कर्मचारी यांचे विरुद्ध शिस्तभंगाची व फौजदारी कारवाई करण्यात करण्यात यावी अशी मागणी हरेश हरड यांनी केली आहे.



# गाठीचे महात्म्य

**कवी गिरीधर पिंगळे**
**गोरठण बुद्रुक**

जगाचे रहाटगाडगे नेहमी सतत चालू असते. दिवसाच्या शेवटी रात्रीची गाठ पडते; आणि रातीनंतर दिवसाची गाठ पडते. जेव्हा पहाट होते सूर्य उदयाला येतो तेव्हा त्यांच्या प्रकाशाशी गाठ पडून अंधार नाहीसा होतो. सूर्याची पिवळी पिवळी किरणे झाडांच्या शेंड्यावर पिवळया किरणांची गाठ हिरवा रंग जावून काही काळापुरता पिवळा सोनेरी रंग येतो. सकाळच्या शांत प्रहरी नदीच्या काठावर बगळयांची गाठ पडून ते एकत्र अन्नाच्या शोधात असतात. मधूनच शिकार-याने मारलेल्या बाणाने सर्व बगळे अकस्मात उडून जातात. ज्याला जिकडे वाट मिळेल त्या दिशेने उडून जातात. नशीब त्यांचे की एकालाही बाण लागला नाही शिका-याचा बाण वाया गेला. चा-यासाठी बाहेर पडलेल्या हरणांचा कळप अगदी स्वच्छंदपणे बागडत आपले खाद्य शोधत ते जणू सर्वांची गाठ पडून गुण्यागोविंदाने विहार करत होते. इतक्यात अचानकपणे तेथे वनाच्या रानाशी पडली गाठ आणि सर्व हरणांची पाचावर धारण बसली ती जीवाच्या आकांताने सैरावैरा पळू लागली. वाट फुटेल तिकडे पळाली यासाठी कवीश्रेष्ठ गदिमांनी गीतरामायण लिहिलेल्या चार ओळी
दोन ओडक्यांची होते सागरात भेट

**एक लाट तोडी दोघा पुन्हा नाही घाट**
**क्षणिक तेवी आहे**
**बाळा मेळ माणसांचा**
**पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा ||**

खरंच मानवी आयुष्य व प्राणीमात्रांच्या जीवनाचे यथार्थ वर्णन वरील ओळीत आहे. गाठीवरून आठवलं माणसाच्या आयुष्यातील अविस्मरणीय गोड नाजूक भावनांची गाठ म्हणजे लग्नगाठ. माणसाच्या 16 सोपस्कारापैकी मनाला भावणारी आनंद देणारी नवन्मेश फुलवणारी अशी गाठ? दोन जीवांचे अन परस्पर वेगवेगळ्या विचारांची दोन व्यक्ती तेही पुरुष आणि स्त्री. संपूर्ण आयुष्यभर एकमेकांना साथ देण्यासाठी बंधनात अडकणार आहेत. लग्न गाठीला रेशीमगाठ असे संबोधतात. कापडामध्ये रेशमी वस्त्र म्हणजे एक तलम असे वस्त्र आहे. लग्न गाठीला रेशमा इतके महत्त्व आहे. त्यात स्वर्गसुखाचा आनंद आहे. याच लग्न बंधनात अडकणाऱ्या दोन जीवांच्या मनात असणाऱ्या भावभावनांचे वर्णन कवीने केले आहे

**फुलले रे क्षण माझे फुलले**
**मेंदीने शकुनाच्या मेंदीने**
**हसले रे क्षण माझे हसले ||**

या ओळीत त्या दोघांच्या मनोमिलनाच्या अवस्थेचे अतिशय सुंदर व रसभरीत वर्णन कवीने केले आहे.

नव्याचे नऊ दिवस होते न होते तेव्हा दोन जीवांमध्ये इगो निर्माण होऊन कधीकाळी जन्मो जन्माच्या मारलेल्या गाठी अन् आणाभाका घेतलेले दोन जीव एवढ्या तेवढ्या कारणावरून भांडतात. कारण तरी काय? कमी पैसा, नवरा घोरतो नवरा दुसऱ्याचे ऐकतो, नवरा छंदीपदी आहे, व्यसनाधीन आहे, अशी अनेक कारणे आहेत. एवढ्या वरूनच घटस्फोट डिहोस गावठी भाषेत काडीमोड पर्यंत मजल जाते. लग्नगाठ इतकी कच्ची आहे काय की आम्ही पाश्चात्त्य संस्कृतीकडे वळलो आहोत. इतिहासकाळात राजे राजवाडे खोत दोन दोन चार चार बायका करत परंतु पहिल्या लग्नाची रंगत काही न्यारीच .म्हणून म्हणतात ना ........

**एक धागा सुखाचा**
**शंभर धागे दुःखाचे**
**जरतारी हे वस्त्र माणसा**
**तुझ्या आयुष्याचे ||**

भारतीयांची आन शान व अभिमान असा आपला राष्ट्रीय ध्वज राष्ट्रीय सणादिवशी ध्वजारोहण करतो त्यादिवशी राष्ट्रध्वजास जी गाठ बांधतात तिला इंग्रजीत कटलाईन मराठीत सुरुची गाठ म्हणतात. गाठ म्हटली तर घट्ट बांधतात. वेळेवर मोकळेपणाने सुटावी यासाठी राष्ट्र ध्वजारोहणाला जमलेले भारतीय नागरिक हजारोंच्या संख्येने नजरा खिळलेल्या असतात. ध्वजारोहण निर्विघ्न पार पाडावे व बांधलेली गाठ सहजपणे सुटल्यास सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत असतो. कधी कधी हीच गाठ सुटण्याऐवजी घट्ट होत असते अशावेळी ध्वजाची दोरी कमकुवत असेल तर दोरी तुटते अनर्थ ओढावतो. काही संस्था ध्वजाची दोरी चांगले आहे किंवा नाही हे पहातच नाहीत याला काय म्हणावे?

आमच्या लहानपणी महिलांना लेडीज पर्स नव्हत्या अशा वेळी आमची आई एखादी महत्त्वाची वस्तू अथवा खाऊ आपल्या लुगड्याच्या पदराला गाठ मारून आपले नेहमीचे काम करीत. आमचे लक्ष त्या गाठीकडेच असायचे. गावात गोळेवाला घंटी वाजवीत आला की आम्ही आईला गळ घालायचं एक पैसा तरी मिळेल या आशेवर राहायचं गोड बोलून जमलं नाही तर मग शेवटच अस्त्र म्हणजे भोकाड पसरायचो व आईचे मन पाझरायचे. हातावर एक पैसा मिळायचा अथवा खाऊ असेल तर खाऊ मिळायचा.

भारतीय स्वातंत्र्यासाठी सर्व जनतेने एकत्र येऊन त्यांच्या गाठीभेटी व्हाव्या म्हणून लोकमान्य टिळकांनी शिवजयंती उत्सव व सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केले अशा वेळी जनतेच्या गाठीभेटी होऊन भारतीय जनतेचे मनोमिलन झाले. स्वातंत्र्यसंग्रामाला नवसंजीवनी मिळाली वाल्या कोळयाची व नारदाची गाठ पडली अन् वाल्याचा वाल्मिक ऋषी जन्मास आला. रामकृष्ण परमहंस आणि विवेकानंदांची गाठ पडली विवेकानंद स्वामी झाले. अध्यात्माची पताका जगभर उंचावली अफजल खानाची व शिवरायांची गाठ प्रतापगडाच्या पायथ्याशी पडली .गाठ पडली ठका ठका असे झाले .एक मोठा इतिहास घडला.औरंगजेबाच्या दरबारात छत्रपती शिवाजी महाराजांची गाठ पडली. बाणेदार माणूस कसा असावा अशी सर्वांना भूल पडली. गौरवशाली इतिहासाने पानेच्या पाने भरली.

आपले पोट अचानकपणे दुखू लागले तेव्हा डॉक्टरकडे जाऊन प्राथमिक उपचार घेतो परंतु सततच पोट दुखत असेल तर डॉक्टर त्या माणसाचा एक्स-रे काढण्यास सांगतात त्याचे शरीरात गाठ असल्याचे निष्पन्न होते. ऑपरेशन करून गाठ काढली जाते. हीच गाठ कधी कधी अर्धा ते एक किलो पर्यंतचे असते एवढी मोठी गाठ असूनही सदर माणसाला जाणीव कशी झाली नाही? गाठ काढली एवढ्यावरच उपचार थांबत नाहीत तर ती गाठ कसली आहे? याची पडताळणी करावी लागते.गाठ लॅबमध्ये पाठविली. जाते.गाठीचे निदान होते. निदान होऊन ती गाठ कॅन्सरची असेल तर त्या माणसाच्या हालअपेष्टांची कल्पनाच करवत नाही.घरात श्रीमंती असेल तर फार मोठ्या खर्चिक दवाखान्यात नेऊन उपचार होतो अन्यथा त्याची मरणाची तारीख ठरून त्याची गाठ मरणासी होते. त्याचेच कशाला? जो जन्माला येतो त्या सर्वांची गाठ मरणाशी होते. यातून कोणीही चुकत नाही. अशावेळी आपण कमावलेले धन सोबत येत नाही. आपले आप्तेष्ट स्मशानासोबत येतात. आपल्या सोबत येते ते आपले कर्म. आपण जेव्हा घराबाहेर पडतो त्या अगोदर कर्म आपल्यापुढे धावत असते. जैसे ज्यांचे कर्म तैसे फळ देते रे ईश्वर. आपण नेहमी केलेले कर्म तेही फळाची अपेक्षा न करता साठीला पुण्य हवे. तेवढेच आपल्या पाठी शिल्लक राहते यासाठी चार काव्यपंक्ती

**माती सांगे कुंभाराला**
**पायी मज तुडवीशी**
**तुझाच आहे शेवट वेड्या**
**माझ्या पायाशी ||**

**जय हिंद जय महाराष्ट्र**

# 'माझी शाळा सुंदर शाळा' स्पर्धेत मायणी–कोयना शाळा अव्वल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : मुख्यमंत्री 'माझी शाळा सुंदर शाळा' स्पर्धेत रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मायणी–कोयना केंद्र, गागोदे बुद्रुक (ता. पेण) यांनी प्रथम क्रमांक पटकावत ३ लाख रुपयांचे बक्षीस मिळविले आहे. शाळेच्या भौतिक सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता आणि डिजिटल परिवर्तन यासाठी राबविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची शासनस्तरावर दखल घेण्यात आली आहे.








परसबाग, सुसज्ज प्रयोगशाळा, संगणक कक्ष, क्यूआर कोड आधारित शिक्षण, वाचन कुटी, 'बालवैज्ञानिक कक्ष', आर्थिक व डिजिटल साक्षरतेचे उपक्रम यांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली आहे. शाळेच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण असून ग्रामीण भागातील शाळाही नव्या कल्पनांमुळे उत्कृष्टतेचे मानदंड निर्माण करू शकतात, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

**मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धेमध्ये तालुक्यातील १८ केंद्रातील २८७ शाळांचे मूल्यांकन गटविकास अधिकारी गजानन लेंडी यांच्या अध्यक्षतेखाली गटशिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली विस्तार अधिकारी अरुणादेवी मोरे आणि सर्व केंद्रप्रमुख यांच्या सहकार्याने करण्यात आले असून त्यामध्ये प्राथमिक आणि माध्यमिक शाळांना तीन तीन नंबर देऊन या शाळांचे अंतरंग आणि बाह्यरंग तपासणी करून शाळेतील ज्या ज्या चांगल्या गोष्टी आहेत विद्यार्थी पूरक आणि उपक्रम पूरक आहेत अशा शाळांची निवड करण्यात आली त्यामध्ये पेण तालुक्यात प्रथम क्रमांक रा.जि.प शाळा मायनी कोयना व्दितीय क्रमांक रा.जि.प शाळा बळवली तृत्तीय क्रमांक रा.जि.प शाळा रावे यांनी मिळवला तर खाजगी व्यवस्थापनाच्या माध्यमिक विभागात प्रथम क्रमांक सार्वजनिक विदयामंदिर पेण व्दितीय क्रमांक न्यू इंग्लिश स्कुल जोहे तृत्तीय क्रमांक जय किसान विदयामंदिर वडखळ या शाळांनी मिळवले असून या शाळा भविष्यात जिल्हास्तरावर पुढे याव्यात असा आशावाद व्यक्त केला. - शर्मिला शेंडे -गटशिक्षणाधिकारी पेण**

# रमजान सणाच्या अनुषंगाने विविध यंत्रणा सोबत बैठक संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर, भाप्रसे यांचे अध्यक्षतेखाली नविन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला , कॉन्फरन्स हॉल येथे दि. १२/०२/२०२६ रोजी रमजान सणाच्या अनुषंगाने विविध यंत्रणा सोबत बैठक संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये मा. आयुक्त यांनी स्वच्छता, वाहतुक, सुरक्षा, पाणी पुरवठा व मार्केट मधील गर्दीचे व्यवस्थापन तसेच फेरीवाले विक्रेते यांना जागा उपलब्ध करून देणे बाबत चर्चा करण्यात आली. रमजान काळात स्वच्छता राखणेकामी इफ्तारीनंतर होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे, कचरा डब्बे वाढवणे, दररोज झाडू मारणे,




डीप क्लिनिंग करणे आणि स्वच्छता राखण्यासाठी रेस्टॉरंट / हॉटेलशी समन्वय साधणेबाबत तसेच दिवसातून दोन वेळा कचऱ्याचे डब्बे क्लिन करणे, प्रत्येक ठिकाणी 2 वेळा घंडागाडी फिरविणे, डीप क्लिनिंग करणेकामी पाणी पुरवठा विभागामार्फत पाणी उपलब्ध करून घेणेबाबत आरोग्य विभागास सुचना देण्यात आल्या. वाहतूक विभागास गर्दीचे व्यवस्थापन करणे, विक्रेत्यांसाठी ठिकाणे ओळखणे आणि स्थानिक प्रतिनिधींना सहभागी करून घेणे बाबत सुचित केले. पाणी पुरवठा विभागामार्फत टँकरद्वारे जेथे जेथे पाणी पुरवठयाबाबत तक्रारी आहेत अशा ठिकाणी पाणी पुरवठा करणे, डीप क्लिनिंग करणे करणेकामी आरोग्य विभाग, प्रभाग समिती यांना आवश्यक ते ठिकाणी पाणी उपलब्ध करून देणे. तसेच पाणी पुरवठयाचे वेळापत्रक प्रसिध्द करणेबाबत सुचना दिल्या. सुरक्षेच्या दृष्टीकोणाने आवश्यक त्या संवेदनशील ठिकाणी सी.सी. टी.व्ही कॅमेरे बसविणे, पोलीसांशी समन्वय साधणे व संभाव्य आगीच्या धोक्यांना तोंड देणेकामी सर्व यंत्रणा सज्ज ठेवणे. विक्रेता व्यवस्थापनेच्या अनुषंगाने विक्रेत्यांचे नियमन करणे, संभाव्यत: वॉर्ड आधारीत प्रणालीद्वारे आणि विद्युत सुरक्षिततेला प्रोत्साहन देणे बाबत सुचित केले. तसेच रमजानचे काळात कोठेही विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही याची खबरदारी घेणेकामी टोरँट पावर यांना सुचित केले आहे. त्याचबरोबर विक्रेत्यांना तात्पुरते स्वरूपात मीटर पुरविण्यात आल्यास तेथे कोणत्याही प्रकारे शॉक सर्कीट झाल्यास त्यावर योग्य ती उपाय योजना करणेची संपुर्ण जबाबदारी ही टोरँट पावर यांची असेल असे सुचित केले. मार्केट विभागामार्फत फेरीवाल्यांना / विक्रेत्यांना परवानगी देणे. तरी सर्व विभागांनी आंतर विभागीय समन्वयावर भर देणे गरजेचे असून आवश्यक ती कार्यवाही विहीत मुदतीत करुन रमजान हा सण योग्य तो रित्या साजरा करता येईल याची दक्षता घ्यावी अशा सुचना मा. आयुक्त यांनी सदर बैठकीच्या अनुषंगाने विभागांना दिल्या. याप्रसंगी मा. अतिरिक्त आयुक्त-1 विठ्ठल डाके , मा.अतिरीक्त आयुक्त-2 नयना ससाणे, मा. सहा. पोलीस आयुक्त रमेश सांगळे, मा. उप-आयुक्त (कर) बाळकृष्ण क्षिरसागर, मा.शहर अभियंता जमील पटेल, मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक निजामपुरा विश्वास डगळे, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक शांतीनगर विनायक गायकवाड, मा. स.पोलीस निरीक्षक अमित गोते, मा. भिवंडी शहर पोलीस ठाणे खराडे, मा.आर. सी.एच.ओ./एम.ओ.एच डॉ.वर्षा चौधरी, स्वच्छताआरोग्य विभाग प्रमुख फैसल तातली, मार्केट विभाग प्रमुख स्नेहल पुण्यार्थी, सी. एस.आय. जे.एम.सोनावणे व एच.बी.भंडारे व अधिकारी / कर्मचारी वर्ग उपस्थित होता.





# तानसा अभयारण्यात चिमुकल्यांचा किलबिलाट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा** : विध्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात परिसर अभ्यासाची माहिती व्हावी या हेतूने "जि. प. शाळा साठेपाडा" येथील शिक्षकांनी शाळा व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने, पालकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे एकदिवसीय परिसर सहल तानसा अभयारण्य येथे आयोजित केली होती. विध्यार्थ्यांमध्ये भौगोलिक जाणीवा तयार व्हाव्यात, त्यांच्यातील सामाजिक जाणीवा विकसित व्हाव्यात आणि या सोबतच त्यांच्यातील शैक्षणिक दृष्टीकोन वाढण्यासाठी अशा शालेय उपक्रमांची परिसरातील सर्वच शाळांनी आखणी करावी या दृष्टीने सरपंच सौ.साक्षी संतोष साठे यांनी सुद्धा चिमुकल्या विध्यार्थ्यांच्या परिसर भेटीला हजर राहून सहलीचा आनंद घेतला व शुभेच्छा दिल्या. ह्या एकदिवसीय परिसर सहलीने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर निसर्गरम्य वातावरण बागडल्याचा आनंद ओसंडून वाहत होता.

## आ. ॲड. निरंजन डावखरे यांच्या निधीतून ठाणे जिल्ह्यात
# शाळा-महाविद्यालयांसाठी डिजिटल साहित्य वाटप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : आमदार स्थानिक विकास निधी अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये, वाचनालये तसेच शासकीय कार्यालयांसाठी डिजिटल साहित्य वाटप समारंभ वर्तक नगर, ठाणे येथील भाजप कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास भाजप महाराष्ट्र प्रदेश महामंत्री ॲड. माधवी नाईक, भाजप ठाणे जिल्हाध्यक्ष श्री. संदीप लेले, ठाणे महानगरपालिका उपमहापौर श्री. कृष्णा पाटील, कोकण पदवीधर प्रकोष्ठ संयोजक श्री. सचिन मोरे, भाजप महाराष्ट्र शिक्षक आघाडी संघटन सदस्य श्री. एन. एम. भामरे व इतर मान्यवर




यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या उपक्रमांतर्गत आधुनिक डिजिटल साहित्याचे वितरण करून तंत्रज्ञानाधारित शिक्षणाला चालना देणे, अध्यापन अधिक परिणामकारक करणे आणि शैक्षणिक तसेच प्रशासकीय कामकाज अधिक सक्षम बनवणे हा मुख्य उद्देश असल्याचे आमदार ॲड. निरंजन डावखरे यांनी नमूद केले. डिजिटल साधनांच्या वापरामुळे शासकीय कार्यालये अधिक कार्यक्षम होतील, मानवी चुका कमी होऊन वेळेची बचत होईल; शासनाचे 'पारदर्शक आणि गतिमान प्रशासन' हे धोरण राबवण्याच्या दृष्टीनेच हा महत्त्वाचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. शासकीय कार्यालयांना देण्यात आलेल्या डिजिटल सुविधांमुळे प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख होऊन सर्वसामान्यांना सेवा अधिक जलद मिळण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आदरणीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या 'डिजिटल इंडिया' संकल्पनेला आणि माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर वाढत आहे. डिजिटल साधनांमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानविस्ताराला गती मिळून शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण होईल. शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडविण्यासाठी आमदार निधीतून अशा उपक्रमांना पुढेही प्राधान्य दिले जाईल, असेही मनोगत व्यक्त करताना आमदार ॲड. निरंजन डावखरे यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमास शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिनिधी, शिक्षक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डिजिटल साहित्य वाटपामुळे ठाणे जिल्ह्यातील शैक्षणिक व प्रशासकीय गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# ठाण्यात महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या उपस्थितीत स्वच्छता अभियान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, दि. 14** : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून ठाणे महानगरपालिका मार्फत राबविण्यात येत असलेली सर्वंकष स्वच्छता मोहीम आज (14 फेब्रुवारी 2026) प्रभाग क्र. 1 मध्ये महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडली. माजिवडा-मानपाडा प्रभाग समितीअंतर्गत येणाऱ्या आनंदनगर अग्निशमन केंद्र परिसरात स्वच्छतेची शपथ घेवून या मोहिमेस प्रारंभ करण्यात आला. महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या उपस्थितीत झालेल्या या उपक्रमास महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (2) प्रशांत रोडे, नगरसेविका अनिता ठाकूर, नगरसेवक विक्रांत तांडेल, सहायक आयुक्त सोनल काळे, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, मुख्य स्वच्छता निरीक्षक शयूराज कांबळे, उपमुख्य स्वच्छता निरीक्षक लक्ष्मण पुरी, तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मोठ्या संख्येने नागरिकांनीही या मोहिमेत सहभाग नोंदविला.



महापौरपदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी कोपरी परिसरातून स्वच्छता मोहिमेची सुरुवात करण्यात आली होती. स्वच्छता ही नियमितपणे केली जात असली तरी शहरातील अंतर्गत रस्त्यांची सखोल साफसफाई, पाण्याने रस्ते धुणे अशा व्यापक स्वरूपातील मोहिम सर्व 33 प्रभागांमध्ये स्थानिक नगरसेवकांच्या सहकार्याने राबविण्यात येणार असल्याचे महापौरांनी सांगितले.

आनंदनगर अग्निशमन केंद्र येथून मोहिमेला प्रारंभ करून आनंदनगर सिग्नल, कावेसर, कासारवडवली आणि ओवळा या भागांत सर्वंकष स्वच्छता करण्यात आली. या अभियानासाठी एक जेटिंग गाडी, दोन सीएनडी गाड्या, कचरा उचलण्यासाठी दोन आरसी कॉम्पॅक्टर व चार घंटागाड्या तैनात करण्यात आल्या होत्या. सुमारे 200 सफाई कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने रस्ते झाडून कचरा उचलण्यात आला तसेच एसटीपीच्या पाण्याने रस्ते धुऊन स्वच्छ करण्यात आले.

या मोहिमेत स्वच्छता निरीक्षक अक्षय सदगीर, रवींद्र म्हात्रे, महेश गायकवाड, गणेश रिपोर्टे, सुमित जाधव, समीर डोळे, उमेश सावंत, कांतीराम गायकर, प्रशांत खांबे, विशाल खांबे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक नागरिक सक्रियपणे सहभागी झाले होते.

स्वच्छता ही सामूहिक जबाबदारी असून शहर अधिक स्वच्छ व सुंदर करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन महापौरांनी यावेळी केले.

# हिंद-दी-चादर' निमित्त भिवंडी पालिकेचे विविध उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी शहर महानगरपालिकेच्यावतीने आयोजित केलेल्या 'हिंद-दी-चादर'चा कार्यक्रम व विविध उपक्रमांना शालेय विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत कार्यक्रम यशस्वी केला. आयोजित कार्यक्रम निमित्तान सकाळी प्रभात फेऱ्या व निबंध स्पर्धत सहभागी होत विद्यार्थ्यांनी गुरु तेग बहादूर साहिबजींच्या त्यागाचा, शौर्याचा, बलिदानाचा संदेश या निमित्ताने दिला.




'हिंद-दी-चादर' म्हणून ओळखले जाणारे श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त भिवंडी महानगरपालिकेच्या माध्यमातून विविध शाळांमध्ये शासन आदेशानुसार जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यांच्या त्याग,बलिदान आणि धर्मनिष्ठेचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमांना विद्यार्थ्यांसह शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असल्याची माहिती पालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनकार्याची सविस्तर माहिती देऊन त्यांना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत केले. या निमित्ताने सकाळी प्रभात फेरी काढून विद्यार्थ्यांनी गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या कार्याचा जागर केला. यावेळी त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. शाळांमध्ये विद्यार्थ्यांना गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनावर आधारित लघुपट दाखविण्यात आले. सुप्रसिद्ध गायक सतींदर सरताज यांनी गायलेले 'हिंद-दी-चादर' हे प्रेरणादायी गीत विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. भिवंडी महानगरपालिका शाळा क्रमांक ४७ येथे प्रभात फेरी काढून घोषणांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. तसेच त्यांच्या जीवनकार्यावरील लघुपट प्रदर्शित करण्यात आला. तसेच विद्यालयात निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या उपक्रमांचा मुख्य उद्देश तरुण पिढीने गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा त्याग, बलिदान आणि मानवतेच्या रक्षणासाठी दिलेले योगदान स्मरणात ठेवावे, तसेच राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक मूल्यांची जपणूक करावी, हा संदेश देण्यात आला.

# लोकमान्य सावरकर नगर परिसरातील रस्ते घेणार मोकळा श्वास

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : लोकमान्य सावरकर नगर परिसरातील वाढत्या वाहतूक कोंडीच्या समस्येला अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. नागरिकांच्या सातत्यपूर्ण तक्रारींची दखल घेत प्रभागातील लोकप्रतिनिधींनी थेट रस्त्यावर उतरून अतिक्रमणाविरोधात धडक कारवाई केली.

लोकमान्य सावरकर नगर परिसरात अनधिकृत फेरीवाले, भाजी विक्रेते, टपऱ्या, हातगाड्या तसेच बेवारस वाहने यांमुळे रस्ते अरुंद झाले होते. परिणामी, शाळकरी मुले, ॲम्ब्युलन्स, अग्निशम वाहने, ज्येष्ठ नागरिक आणि नोकरदार वर्गाला दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत होता.

याच पार्श्वभूमीवर वर्तक नगर नाका, यशोधन नगर बस स्टॉप तसेच जुना लोकमान्य डेपो परिसरात प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. लोकमान्य सावरकर प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त बनसोड आणि संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत अतिक्रमण विभागाच्या पथकासोबत संयुक्त कारवाई केली. या मोहिमेत स्थानिक नगरसेविका कांचन चिंदरकर, नगरसेवक राकेश शिंदे, विभाग प्रमुख संतोष धमाले,




## अनधिकृत फेरीवाले, टपऱ्या, हातगाड्या यांचेविरुद्ध धडक कारवाई

समाजसेवक विजय चिंदरकर तसेच शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक रहिवासी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कारवाईदरम्यान अनधिकृत फेरीवाल्यांवर कायदेशीर पावले उचलण्यात आली असून रस्ते मोकळे करण्यात आले. त्यामुळे वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार असून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.नागरिकांनी या कारवाईचे स्वागत करत, भविष्यातही अशाच नियमित कारवाया व्हाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयातून परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या कायमस्वरूपी मार्गी लागेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## ज्युपिटर हॉस्पिटलकडून
# डोंबिवलीत ५०० खाटांचे बहुविशेषज्ञ रुग्णालय सुरू

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : ज्युपिटर हॉस्पिटल तर्फे डोंबिवली येथे ५०० खाटांचे अत्याधुनिक बहुविशेषज्ञ रुग्णालय रविवार, दिनांक १५ फेब्रुवारी रोजी उद्घाटनासाठी सज्ज झाले असून, यामुळे मुंबई महानगर प्रदेश मधील प्रगत आरोग्यसेवा सुविधांमध्ये महत्त्वपूर्ण भर पडणार आहे.

कल्याण डोंबिवली महानगर पालिका, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर या परिसरांमध्ये दर्जेदार आरोग्यसेवेची दीर्घकाळापासून गरज भासू लागली होती. या भागातील रुग्णांना गंभीर उपचारांसाठी ठाणे किंवा मुंबई येथे जावे लागत असल्याची अडचण लक्षात घेऊन ज्युपिटर हॉस्पिटलने डोंबिवली येथे ५०० खाटांचे सुसज्ज




रुग्णालय सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

हे रुग्णालय सर्वसमावेशक आरोग्यसेवा देणारे पूर्ण-सुविधायुक्त केंद्र असेल. नवजात शिशूंच्या जन्मापासून ते अवयव प्रत्यारोपण आणि कर्करोग उपचारांपर्यंत सर्व वैद्यकीय सुविधा येथे उपलब्ध असतील. समाजातील सर्व घटकांच्या आरोग्याच्या गरजा पूर्ण करण्याचा यामागील उद्देश आहे.

सध्या उपलब्ध असलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेल्या या रुग्णालयात आधुनिक मॉड्युलर ऑपरेशन थिएटर्स, अतिदक्षता विभाग (क्रिटिकल केअर) आणि प्रगत डायग्नॉस्टिक सुविधा उपलब्ध असतील. तसेच हे रुग्णालय IGBC च्या सर्वोच्च पर्यावरणीय मानकांनुसार डिझाइन करण्यात आले आहे.

डॉ. अजय ठक्कर, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, ज्युपिटर हॉस्पिटल, म्हणाले, "मोठ्या भारतीय शहरांमध्ये उच्च दर्जाच्या आरोग्यसेवेसाठी कोणालाही ४५ मिनिटांपेक्षा अधिक प्रवास करावा लागू नये. आमची दृष्टी नेहमीच सर्वसमावेशक आणि उत्कृष्ट वैद्यकीय सेवा रुग्णांच्या जवळ उपलब्ध करून देण्याची राहिली आहे. डोंबिवलीतील ५०० खाटांच्या रुग्णालयाचे उद्घाटन हे वाढत्या समुदायांसाठी प्रगत आणि रुग्णकेंद्रित आरोग्यसेवा विस्तारण्याच्या आमच्या बांधिलकीचे प्रतीक आहे."

डॉ. अंकित ठक्कर, व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी, ज्युपिटर हॉस्पिटल, यांनी सांगितले,"भारतीय संस्कृतीत रुग्णाच्या कुटुंबाची भूमिका त्याच्या उपचार प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाची असते, याची आम्हाला जाणीव आहे. आमची रुग्णालये केवळ रुग्णांच्या नव्हे, तर त्यांच्या कुटुंबीय आणि काळजीवाहूंच्याही गरजा लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आली आहेत. रुग्णांना योग्य वैद्यकीय उपचारांसोबतच उत्तम आरोग्यसेवेचा अनुभव मिळावा, यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे सांगितले.

# वासिंद ग्रामपंचायत उपसरपंचपदी विशाखा शेलार यांची निवड !



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : वासिंद ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी विशाखा विकास शेलार यांची बिनविरोध निवड झाली आहे.

कार्यरत उपसरपंच ज्योती भेरे यांनी राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त झाले होते. त्यामुळे या उपसरपंच पदासाठी झालेल्या निवडीत विशाखा शेलार यांची बिनविरोध निवड झाली आहे. सदर ग्रामपंचायती मध्ये एकूण सतरा सदस्य संख्या आहे.

सरपंच राजेंद्र म्हसकर यांच्या अध्यक्षतेखाली व प्रभारी ग्रामपंचायत अधिकारी रमेश सासे यांच्या देखरेखीखाली हि निवडणूक प्रक्रिया पार पडली. शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहरप्रमुख विकास शेलार यांची पत्नी विशाखा विकास शेलार या वार्ड क्रमांक 2 येथून सदस्य म्हणून निवडून आलेल्या आहेत. त्यांच्या निवडीनंतर मिरवणूक काढण्यात आली होती. यावेळी राजकीय, सामाजिक पदाधिकारी कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान या झालेल्या निवडीमुळे येथील विविध नागरी समस्या सोडवून व विकासात्मक कामांना प्राधान्य देणार असल्याचे नवनियुक्त उपसरपंच विशाखा शेलार यांनी म्हटले आहे.




# अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस अंबरनाथ समूहाचा 30 वा वर्धापन दिन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ** : अल्कोहोलिक्स अनॉनिमस ही जगभरात पसरलेली संघटना आहे आणि तिचे अस्तित्व सुमारे १८० देशांमध्ये आणि भारतातील बहुतेक राज्यांमध्ये आहे.ए ए म्हणून ओळखली जाणारी ही संघटना दारू पिणाऱ्यांना संदेश देण्याचे काम करते.ए ए चे स्थानिक समूह आणि दारूपासून दूर असलेल्या त्यांच्या सदस्यांद्वारे बैठका आयोजित करते.या सभेत सभासद आपले अनुभव कथन करतात त्यामुळे या बैठकांना उपस्थित राहणाऱ्या पीडित मद्यपींना दारू पिण्यापासून दूर राहण्याची आशा आणि शक्ती मिळते.ए ए ही एक ना नफा - ना तोटा या तत्त्वावर चालणारी संस्था आहे, ए ए कोणत्याही प्रकारची वर्गणी आकारत नाही आणि ती तिचे दैनंदिन कार्य फक्त ए ए सदस्यांकडून मिळणाऱ्या निधीवर चालवते.ए ए कोणतीही बाहेरील निधी किंवा देणग्या स्वीकारत नाही.ए ए चा कोणत्याही राजकीय,आध्यात्मिक किंवा सामाजिक संघटनांशी संबंध नाही.ए ए संलग्नतेऐवजी अल्कोहोल व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात काम करणाऱ्या इतर संस्थांना सहकार्य करते.भारतात व मुंबई येथे ए ए च्या सभा होत असतात.संस्थेचे कल्याण येथे "ए ए कल्याण आंतर समूह" म्हणून प्रतिनिधिक कार्यालय आहे, त्यांचा संपर्क क्रमांक 9323485476 हा असून आपण तेथेही संपर्क साधू शकतात, या आंतर समूहाअंतर्गत दिवा,डोंबिवली, ठाकुर्ली,भिवंडी, कल्याण,उल्हासनगर, अंबरनाथ,बदलापूर, वांगणी,शहापूर तसेच मुरबाड इत्यादींचा समावेश आहे.या सर्व ठिकाणी संस्थेच्या नियमित सभा होतं असतात. विनामूल्य कार्य करणाऱ्या विश्वव्यापी संस्थेची शाखा ए ए जीवनमार्ग अंबरनाथ समूहास 30 वर्ष पूर्ण झाली. त्या निमित्ताने फातिमा चर्च एन एक्स अंबरनाथ पश्चिम येथे मद्यपीडितांसाठी वर्धापन दिनानिमित्त एक कार्यक्रम आयोजित केला होता. सातत्याने गेली 30 वर्ष ए ए जीवनमार्ग समूह अंबरनाथ कार्यरत राहून संभाव्य मद्यपीना ए ए चा मद्य मुक्तीचा मार्ग दाखवत आपले कार्य करीत आहे.

ए ए जीवनमार्ग अंबरनाथ समुहाच्या नियमित सभा प्रत्येक गुरुवार व शनिवार सायंकाळी साडेसात ते नऊ येथे नियमितपणे होतात.आपल्या संपर्कातअथवा परिचयात जर कोणी अतिमद्यपी असेल तर आपण संपर्क करु शकता.या वर्धापनदिनात फातिमा चर्चचे फादर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते,यासोबत 110 मध्यमुक्त सभासदांनी याचा लाभ घेतला. यावेळी नवीन सभासदांना दारूपासून सहजपणे दूर राहण्यासाठी अल्कोहोलिक ॲनॉनिमस या संस्थेची मार्गदर्शक रुपी पुस्तके ए ए जीवनमार्ग समूह अंबरनाथ तर्फे भेट देण्यात आली.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024